**अमरावती महानगरपालिका, अमरावती**
**दिनांक ०९.०६.२०२२ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय**

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक १६ :-** अमरावती शिट क्रमांक ६८ सी प्लॉट क्र. २४/१ या जागे मधुन महानगरपालिकेनेबांधलेला रस्ता संबंधातील कार्यवाही करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये मा. आयुक्त यांना प्राधिकृत करण्या बाबत.

**ठराव क्रमांक १६ :-** अमरावती शिट क्रमांक ६८ सी प्लॉट क्र. २४/१ या खाजगी जागे मधुन २०-२५ वर्षे पुर्वी महानगरपालिकेने रस्त्याचे बांधकाम केलेले आहे. सदर रस्ता बांधकाम करतांना जमीन मालक यांची संमती न घेता रस्त्यांचे बांधकाम केले असल्याचे दिसून येते. उक्त जागेचा जमीन मालक श्री. गोपाल मो. गुप्ता यांनी दिनांक २६/४/२०२२ रोजीचे अर्जा नुसार सदर रस्ता खालील जागेचा मोबदला मागणी केलेली आहे. उक्त रस्ता खालील जागेचे एकुण क्षेत्रफळ ११६.८७ चौ.मी. आहे. सदर जागेच्या मोबदल्यात जमीन मालक यांना टीडीआर देण्याचे प्रस्तावित आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये नविन सार्वजनिक रस्ते तयार करण्याकरीता मा. आयुक्त याबाबत महानगरपालिके कडुन प्राधिकृत करण्यात येईल. तेव्हा कोणत्याही वेळी पुढील गोष्टी करता येईल.
क) नविन सार्वजनिक रस्ता आखणे व तयार करणे.
ड) कोणत्याही व्यक्तीच्या जमिनीतुन, पुर्णपणे अशा व्यक्तीच्या खर्चाने किंवा अंशतः अशा व्यक्तीच्या खर्चाने किंवा अंशतः महानगरपालिकेच्या खर्चाने सार्वजनिक उपयोगासाठी रस्ता तयार करण्यासाठी आणि असा रस्ता पूर्ण झाल्यावर तो सार्वजनिक रस्ता होईल व तो महानगरपालिकामध्ये निहित होईल असा करार अशा व्यक्तीं बरोबर करणे.
क) पुल व भुयारी मार्ग बांधणे
ड) महानगरपालिकामध्ये निहित असलेला विद्यमान सार्वजनिक रस्ता किंवा त्यांचा कोणताही भाग फिरविणे व वळवणे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये उक्त रस्ता घोषित करण्याची कार्यवाही करण्या करीता मा. आयुक्त यांनी दिनांक ७/६/२०२२ रोजीला मान्यता दिलेली आहे.

सबब, सदर प्रकरणी मा. आयुक्त यांना महानगरपालिके कडुन नविन सार्वजनिक रस्ता घोषीत करण्या संबंधातील कार्यवाही करण्या करीता प्राधिकृत करण्यास सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा/-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा/-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.